## दूरदृष्टीतून उद्योजकता

स्त्री म्हणजेच

W-Workaholic
O- Opportunity
M- Management
A-Aim
N-Noble

स्त्रीच्या रक्तात वेळेचे व्यवस्थापन, वित्त व्यवस्थापन, नाती जपण्याचे जोडण्याचे कसब अंगभूत आहे स्त्री ही जन्मतः एक उद्योगिनी असते.

उद्योगिनी महिलांच्या आयुष्यात वादळ येत असतात. वादळ जस येत तस जातं हि उलट वादळाला ब घाबरता त्याला ध्येर्याने सामोरे गेले पाहिजे. हा गुण महिलांमध्ये असतोच. Survival of Fittest (fittest means one who successfully fits or adjust oneself with the circumstances) परिस्थितीशी जूळवून घेण्याची कला स्त्रियांच्यातच असते. म्हणूनं नाती जपायचे काम स्त्री उत्तम रीतीने करते,

उद्योजकाला वयाची, शिक्षणाची अट लागत नाही. पूर्वी उद्योगाच्या कार्यशाळा नव्हत्या कोणतेही मार्गदर्शन नव्हते अशावेळी वालचंद शेठ हिराचंद यासारखे दूरदर्शी विचार करणारे उद्योजक तयार झालेच. ज्यांनी भारतीय उद्योगाची मुहुर्तमेढ रोवली. त्या वालचंदशेठजींनी विमान, बोट, फियाट (मोटार उद्योग) रेल्वेचे बोगदे बनवण्याचे काम इंग्रजांच्या कारकीर्दीत केले.

आज आपण सर्वजण २१ च्या शतकात एका सुधारणावादी संस्कृतीचे साक्षीदार म्हणूनच आपण सर्वजण सारे जग कार्यरत आहोत. खासकरुन विज्ञान तंत्रज्ञान , उद्योग व्यवसाय, अर्थकारण या क्षेत्रात होणारा विकास आणि समृध्दी ही उदयाच्या नव्या सुधारणावादी संस्कृतीची पाऊलवाट समजली जाते. चारपाच उबऱ्यांची छोटीवस्ती माणसे बनवतात आणि एकमेकांच्या सहकार्याने आधाराने जीवन कंटू लागतात तेव्हाच समाज तयार होतो वस्त्यांचे खेडे खेडयांचे गांव, गावाचे शहर, शहराचा महानगर बनते तेव्हा समाजही विस्तारत जाते. पूर्वी स्वालंबनानेच जगणाऱ्या माणसांवर अशा मोठ्या विस्तारीत समाजातल राहणीमानाचा मोठा तणाव येऊ लागतो. आणि विविध सेवांची स्वतंत्र गरज भासू लागते. आताच्या बदलत्या राहणीमानानुसार सेवा उद्योगाना विलक्षण मागणी आहे.

आज सर्वच क्षेत्रात स्त्रियांचा वाढता प्रभाव लक्षात घेतल्यास येणाऱ्या काळात माहिला अधिक भक्कमपणे आणि बळकटपणे काम करताना दिसतील.केवळ उद्योग क्षेत्राबद्दल

बोलायचे असल्यास महिलांच्या बाबतीत इथले चित्र बदलत आहे. महिला तसेच तरुण उद्योजक या क्षेत्रात येताना दिसत आहेत.विज्ञान व तंत्रज्ञानासोबतच जगात तितक्याच वेगाने उद्योग व्यवसायाची वाढ आणि तीव्रता वाढत आहे.याही क्षेत्रात संधीची नवनवीन क्षितिजे तयार झाली आहेत.उद्योग, विकास, विज्ञान आणि तंत्रज्ञान याबबतीतचा विचार केला तर त्यामध्ये भारताचा सहभाग हा अत्यंत महत्वपूर्ण आहे. भारत हा मिश्र अर्थव्यवस्थेवर आधारलेला देश अन्न, धान्य,आर्युविमा, वाहतूक, दळणवळण, पर्यटन, हॉटेलसारख्या व्यवसायातही आज महत्वाच्या स्थानावर आहे. उद्योग हा काही चमत्कार नाही.

जागतिक महिला दिन ८ मार्च हा दिवस सर्व ठीकाणी वेगेवगेळया संस्था , संघटनांच्या माध्यमातून महिलांसाठी देश विदेशात साजरा करण्यात येतोच.

तसेच जागतिक महिला दिनांचे औचित्य साधून राज्यव्यापी उद्योजक महिला परिषद आम्ही उद्योगिनी द्वारे घेण्यात आली. ह्या परिषदेत उद्योगिनींना बाजारपेठ मिळावी फायनान्स कुठे उपलब्ध होतो., गव्हर्नमेंटच्या योजना काय आहेत? महिलांनी महिलांना कशी मदत करावी? Networking of the business या सर्वांची माहिती त्या त्या क्षेत्रातील दिग्गजांमार्फत मिळाली. दरवर्षी प्रमाणे महिलां उद्योगिनींचा उत्साह अवर्णनीय होता. संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे ९०० हून अधिक महिला उद्योगिनी उपस्थित होत्या. सभागृहात प्रत्येक उद्योगिनींच्या चेहऱ्यावर एक नवचैतन्य होतं काही अपयशी उद्योगिनींना स्फुर्ती मिळाली. जाताना प्रत्येक उद्योगिनी उद्योगासाठी पुरक असे ज्ञान व महाराष्ट्रातील महिला उद्योगिनींचे अनुभव रिटर्न गिफ्ट म्हणून घेऊन गेल्या परिषदेतून उपस्थितांना स्वोट ॲनालिसिस करणे सोपे जाते की आपण काय करु शकतो? काय करीत आहोत? अजून ग्राहकांना काय देऊ शकतो? तसेच  उद्योगात नवीन जोमाने व जिद्दीने काम करायला उद्योगिनी तयार होतात.

जयपूर पासून १०० की.मी अंतरावर तिलोनीया नावाच गाव आहे बंकर रॉय या अवलियाने तिथे बेअरफुट कॉलेज नावाच्या एका जादुई वास्तूची स्थापना केली आहे . वरकरी अडाणी असलेल्या येथील स्त्रियां खूप सुशिक्षित आहेत.या प्रयोगास अनेक राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत. महिला सक्षमीकरणाचं उत्तम उदाहरण म्हणजेच बेअरफुट कॉलेज येथे सहावी सातवी शिकलेल्या महिला दंतवैद्यक शास्त्र शिकून रुट कॅनल करतात, त्यांचे स्वतःच रेडीओ स्टेशन आहे जे महिला शिताफीने चालवतात . डोक्यावर घुंघट असेलेली स्त्री व्हीडीओ एडीटींग करते.तिथल्या स्त्रीया मधील आत्मविश्वास वाखणण्याजोगाच आहे.

दृष्टीकोन ह्या बद्दल वाचना मध्ये आलेली एक गोष्ट एक फ्रेंच तत्वज्ञाकडे एक माणूस आला आणि म्हणाला तुमच्या सारखी बुध्दी मला मिळाली असती तर मी अधिक चांगला

माणूस बनलो असतो त्यावर तत्वज्ञ म्हणाला तुम्ही प्रथम चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न करा म्हणजे माझ्यासारखी बुध्दीही तुम्हाला आपोआप लाभेल. न्नेहमी लक्षात ठेवा मजबूत इमारतीसाठी मजबूत पाया हवा असतो त्यासाठी यशस्वी होण्यासाठीही मजबूत पायाची नितातं आवश्यकता असते असा हा पाया म्हणजे आपला दृष्टीकोन.

स्त्री ने स्त्रियांसाठी व स्त्रि उद्योगिनींसाठी सुरु केलेली एक चळवळ म्हणजेच आम्ही उदयोगिनी असे म्हणायला हरकत नाही. तुमच्या जिद्दीने सुरु केलेल्या उद्योगाची गुढी उभारु मांगल्याची अन् मंगलकार्याची. आपणा सर्वांना गुढीपाडव्यांच्या व नववर्षाच्या खूप खूप शुभेच्छा ! ह्या नववर्षाच्या निमित्ताने आपला उद्योग वृध्दींगत होवो ही सदीच्छा ! धन्यवाद !

**मीनल मोहाडीकर -**

**माजी अध्यक्ष महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज ॲन्ड ॲग्रीकल्चर**

**उपाध्यक्ष महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ**

**अध्यक्ष आम्ही उद्योगिनी प्रतिष्ठान**

**ईमेल : registerme@aamhiudyogini.com**

**०२२-२४३१२४२६**